# चार्चिक स्त्री आमदार

## ➢ विधानसभा व विधानपरिषदेतील चर्चेमध्ये स्त्रियांचा सहभाग तुलनात्मक उदाहरणे आणि त्यांचा अभ्यास

प्रस्तुत प्रबंधकर्तीच्या संशोधनाचा गाभाच मूळ सभागृहातील विधानसभा व विधानपरिषदेतील सदस्यांची भाषणे, जी व्याख्याने छापील स्वरूपात उपलब्ध आहेत. त्यांचा विचार सदर प्रबंधात केलेला आहे. त्यातही स्त्रीसदस्याची भाषणे प्रामुख्याने प्रबंधकर्तीने अभ्यासास निवडली आहेत. मग ती स्त्रीसदस्य सदस्यांच्या प्रश्नांना विधेयकांना कशी सामोरी जाते. शासन म्हणून तिची काय भूमिका आहे? शासनाच्या दृष्टिकोनातूनच तिला तिचे उत्तर ठरवायचे असते, एखादा पुरूष सदस्य एका विषयावर कसा बोलेल? त्याचा त्या विषयाकडे बघण्याचा दृष्टिकोण काय असेल? त्याच विषयाकडे स्त्री सदस्याचा बघण्याचा दृष्टीकोण काय असेल ही वैचारिक तुलना पाहण्यासाठी प्रबंधकर्तीने काही निवडक सदस्यांची भाषणे घेऊन तुलनात्मक अभ्यास केला आहे.

ही व्याख्याने वाङ्मयीन स्वरूपाची नाहीत. त्यांच्या व्याख्यानात कुठे कुठे राजकीय अर्थासहित  कुठे –कुठे जीवनाचे व वाङ्मयाचे सहेतूक दर्शनही होईल असेही कळत – नकळत सूचित केल्याशिवाय राहवत नाही. सदस्यांच्या भाषेला वाङ्मयीन जोड असेलच असेही नाही. परंतु प्रत्येकाची भाषाशैली वेगळी, त्याची ठेवण वेगळी दृष्टिकोण वेगळा, यां सर्वांचा अभ्यासही अभ्यासकर्तीने केलेला आहे.

एक वकील महिला सदस्य एखादा विषय कसा हाताळेल, बोलेल? शिक्षिका महिला सदस्याचा दृष्टीकोण कसा असेल? राजकीय वसा लाभलेल्या स्त्री-सदस्यांची भाषाशैली, समाजकार्यातून उदयाला आलेल्या महिला नेत्या व निवडून आल्यावर त्यांची अभ्यासाची पद्धत, त्यांचे दाखले यात विविधता आढळून येते. संघटनात्मक कामातून, प्रवास करतांना आलेल्या अनुभवाची शिदोरी एखादी कार्यकर्ता सदस्या म्हणून तिची अभिव्यक्ती कशी असेल?

एखाद्या विषयावर पुरूष आणि स्त्रीचे विचार, निष्कर्ष एक  परंतु विचार प्रक्रिया भिन्न भिन्न.मातृशक्ती, स्त्रीशक्ती कशी अभिव्यक्त होते. तिच्या वक्तृत्वात विचारांची उब, भावनेचा ओलावा आढळतो का? महाराष्ट्राच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवरची भाषणे, कायदेविषयक अभिनंदनपर भाषणे, शोकप्रस्तावावरील भाषणे,  लेखक आमदारांची भाषणे, अशा विविध कंगोऱ्यांचा, पैलूंचा अभ्यास करण्यासाठी विधिमंडळ वाचनालयात ही सर्व भाषणे उपलब्ध झाली. या भाषणांवर विविध अंगाने पहाण्याचा, दृष्टिकोणाचा अभ्यास पुढील भाषणांवर करण्याचा प्रयत्न केला आहे.

## १) श्रीमती मृणाल गोरे

### अनुदानाकरिता मागण्या – नगरविकास, आरोग्य व गृहनिर्माण विभाग

### दि. ३ जुलै,१९७२

कोर्स पास झालेले डॉक्टर्स घेण्यात यावेत असा सरकारने जी.आर.काढला पण त्यांना त्यामध्ये घेण्यात आलेले नाही. या इंटग्रेटेड लोकांनी फॅमिली प्लानिंगमध्ये बरीच कामगिरी केली आहे. त्यांना स्टेट आणि मध्यवर्ती सरकारची ॲवार्डस् मिळालेली आहेत. हे लोक खेडेगावांमध्ये उपयुक्त काम करीत असताना त्यांना सर्व्हिसची शाश्वती नाही आणि सिनिऍरिटीप्रमाणे त्यांना सेकंड ग्रेडमध्ये घेण्याची देखील शाश्वती नाही. त्यांच्या नेमणुका अजून झाल्या नाहीत. या गोष्टीचा शासनाने विचार करावा अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महाराज, कामगार विमायोजनेच्या बाबत या बजेटमध्ये असे ठरविलेले दिसते की, पॅनल सिस्टिम बंद करून सर्व्हिस सिस्टिमचा अवलंब करावा. ही सर्व्हिस सिस्टिम खर्चाची आहे. तर  पॅनल सिस्टिम ही कमी खर्चाची आहे. पॅनल सिस्टिममध्ये तेवढीच नावे नोंदवली जात असली तरी तेथील लोकांचा पगार हा जास्त असतो. तेव्हा सर्व्हिस सिस्टिम चालू करण्याचा आग्रह शासनाने धरला तर या सरकारवर अधिक खर्चाचा बोजा पडणार नाही. तेव्हा याबाबत सरकारने लक्ष द्यावयाला पाहिजे तेवढे दिलेले नाही. इंटिग्रेटेड लोकांवर अन्याय झालेला आहे. जोपर्यंत हा अन्याय दूर केला जात नाही, जोपर्यंत आयुर्वेदाकडे योग्य असे लक्ष दिले जात नाही. तोपर्यंत या बजेटला आम्हाला कोठल्याही पद्धतीने मान्यता देता येत नाही. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

- **विश्लेषण -**

गृहनिर्माणसारख्या महत्त्वाच्या विषयावर बोलताना, मृणालताईंनी चाळीमध्ये राहणाऱ्या रहिवाश्यांच्या समस्या किती तिव्र असतात. याचे दाखले दिले आहेत. मोडकळीला आलेल्या चाळी योग्य पद्धतीने पाडत नाहीत वा त्यांची दुरूस्तीही करत नाहीत. भाडे मात्र नियमित वसूल केले जाते. जर मेंटेनन्सचा खर्च भाड्यातून घेतला जात असेल तर,  तो का खर्च केला जात नाही, त्यांनी शास्त्रीनगर परिसरातील चाळींची दुरावस्था वर्णन केली आहे. प्रत्यक्ष चाळकरीही आत्मियतेने हा विषय मांडणार नाही एवढ्या आत्मियतेने तो त्यांनी मांडला आहे. प्रत्येक विषयाच्या तळाशी जाण्याची वृत्ती स्त्रिची असते, हे यावरून दिसते.

स्त्री ही व्यवहारी असते, भाडे घेता मग सुविधा देणे हे तुमचे कर्तव्य तर आहेच, परंतु कायदा सुद्धा तुम्हाला याचा जाब विचारेल. पिण्याचे पाणी व शौचालये नीट नसलीत, त्याची दुरूस्ती करत नसाल तर रहिवाशांनी भाडे तरी का द्यायचे? हा संयुक्तिक प्रश्न त्यांच्या भाषणातून त्या सभागृहासमोर आणतात.

## २) श्री. रामदास फुटाणे

### श्री पांडुरंग शास्त्री आठवले याना मॅगसेसे पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन (दि.१९ जुलै, १९९६)

जगाला झालेला आहे. एका माणसाने आपल्या विचाराने वेड लावणारे, अत्यंत चांगले सत्-प्रवृत्ती ज्या समाजामध्ये रूजविली गेली पाहिजे असे आपण म्हणतो पण ती रूजविणे किती कष्टदायक असते हे आपणा सर्वांना अनुभवाने कळते असे विचार पूज्य दादांनी रूजविले आहेत. व्यसनमुक्ती सारखी गोष्ट, आणि वृक्ष संवर्धन – झाले लावणे आणि ती पूर्ण जगवून दाखविणे, योगेश्वरभाव कृषी सारखे उपक्रम, शोतीतील अत्यंत उत्कृष्ट असे प्रयोग दादा करतात आणि तेही अत्यंत सुखवस्तू पद्धतीच्या व्यक्ती, ज्यांना श्रमप्रतिष्ठा शिकविली जाणे आवश्यक आहे अशा व्यक्ती स्वतः तेथे घाम गाळतात, काम करतात, नेमकी मजुरी केल्यासारखे पण पूर्ण ठेवून अशा प्रकारचे हे उद्योग राबवितात. मत्सगंधा सारखे उपक्रम आणि हा सगळा जो स्वाध्याय परिवार आहे, त्यामागील जे काही एकंदर विचार आहेत ते सगळे सत्-प्रवृत्ती वाढण्याचेच आहेत. माणसाच्या अंगी चांगले विचार, आचार आणि चांगल्या प्रथा रूजविण्याचे हे त्यांचे विचार आहेत. धर्म आणि जात यांच्यापासून अगदी अलिप्त. सर्वांसाठी समावेशक अशा प्रकारचा हा जो पंथ त्यांनी निर्माण केलेला आहे. त्या दृष्टीने त्यांना हा जो पुरस्कार आहे तो त्या पुरस्काराचाच जणू

मला जायचा योग मिळालेला आहे. ठाण्यालाही त्यांचे एक संस्कृतीचे मंदिर आहे, जेथे संस्कार आणि संस्कृती शिकविली जाते. त्या ठिकाणी ही जाण्याचा मला योग आला होता. माणसामाणसामध्ये हृदयाची बंधने निर्माण करून माणुसकी कशी जोडता येईल हे स्वतः दादा कसे करतात हे पाहण्याचाही योग मला आलेला आहे, संधी लाभलेली आहे. माझ्या एका कवितेमध्ये मी म्हटले आहे की –

**“मन जुळते तो क्षण सोन्याचा**
**एक दुजाला सावरण्याचा**
**शब्दविण हृदयाचे स्पंदन,**
**देह जिथे हुंकार**

### ➢ विश्लेषण

श्री. पांडूरंग शास्त्री आठवले यांना मॅगसेसे पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाच्या ठरावावर बोलताना रामदास फुटाणे यांनी श्री. पांडुरंग शास्त्री आठवलेंनी त्यांच्या व्यासंगाची महती, स्तुती केली आहे. त्यांच्या कामाची पद्धत म्हणजे माणसाला माणूस बनविण्याची धडपड आहे, व त्यात यशस्वी झालेत. व्यसनमुक्ती, शेती जोपासणे, झाडे लावणे, जोपासणे या उपक्रमांचा लेखाजोखा त्यांनी सभागृहासमोर मांडला आहे. जात – धर्माच्या पलिकडे जाऊन माणसातल्या माणसाचा शोध त्यांनी सातत्याने चालू ठेवला आहे. म्हणून ते या पुरस्कारासाठी कसे योग्य आहेत हे पटवून दिले आहे. ‘मन जुळते तो क्षण

सोन्याचा’ या चारोळीतून फुटानेंनी दादांच्या संस्कृती मंदिरातील संस्कार व संस्कृतीच्या अध्ययनाचे कौतुक केले आहे. असे मंदिर विरळे, संस्कारी बनविण्याची धडपड विरळा, सर्वच आदर्शाची उंच शिखरे उभारणीच्या कार्याला या पुरस्काराने गौरविणे म्हणजे त्यांच्या कार्याला सलाम करणे होय. मोजक्याच शब्दांत त्यांनी हे मांडले आहे.

### ३) श्री. अरूण मेहता

### श्री पांडुरंग शास्त्री आठवले यांना मॅगसेसे पुरस्कार मिळाल्याबाबत त्यांचे अभिनंदन (दि. १९ जुलै, १९९६)

जनसामान्यातून आलेले होते. त्यांच्यासाठी दुथडी भरून नदी वाहते त्याप्रमाणे दुथडी भरून माणसे वाहतात. परंतु येथे चेंगराचेंगरीमध्ये कोणी मरत नाही. महापालिकेला तेथील घाण काढण्यासाठी पथके कामाला लावावी लागत नाहीत, पोलिसांवर ट्रॅफिक बंदोबस्ताचा ताण येत नाही. स्वयंप्रेरणेतून निर्माण झालेली शिस्त ही माणसाच्या आयुष्याला मुळातच पूर्णपणे बदलून टाकते.

भगवद्गीते सारखे अत्यंत कठीण तत्वज्ञान जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे महान कार्य शास्त्रीजींनी केलेले आहे. त्याचबरोबर त्यांनी आणखी एक सगळ्यात महत्त्वाचे काम केलेले आहे. दिवसेंदिवस वाढत चाललेल्या व्यसनाधिनतेवर आपण शासकीय माध्यमातून उपाययोजना करतो. सामाजिक संस्थाही उपाययोजना करतात. परंतु मोठ्या प्रमाणामध्ये सर्वसामान्यांची व्यसनमुक्ती करण्याचे काम पांडुरंगशास्त्री आठवले यांनी केलेले आहे. हे खरोखरच अनन्य साधारण असे काम आहे. हे काम कदाचित गिनीज बुकामध्येसुद्धा नोंदले पाहिजे. या ठिकाणी बोलत असताना अनेक सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या बाकीच्या सर्व गोष्टींबद्दल सांगितलेले आहे. सर्वसामान्य माणसाला माणुसकी शिकविणारे या जगाचे तत्त्वज्ञान शिकविणारे आणि सर्वसामान्य माणसाला कसे जगावे, यासंदर्भात आमचे जे अध्यत्म आहे, या अध्यात्माला नवीन रूप देणारे श्री पांडुरंगशास्त्री आठवले हे खरोखरच हा पुरस्कार घेण्याला अत्यंत योग्य आणि पात्र आहे. त्यांचे काम, त्यांची विद्वत्ता, त्यांचा त्याग हे सर्व माझ्या सारख्या बाईने त्यांचे अभिनंदन करण्याइतके नाही तर त्यांना अभिनंदन केले तर ते अधिक योग्य होईल.

- **विश्लेषण**

मृणाल गोरे यांनी श्री पांडूरंग शास्त्री आठवलेंना मॅगसेसे पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल अभिनंदनाच्या ठरावावर बोलताना त्यांनी अध्यात्माला नवीन रूप देणारे पांडूरंग शास्त्री भगवद्गीते सारखे कठीण तत्त्वज्ञान कृतीतून, संवादातून सोपे करून समाजमनावर ठसवितात. मोठ्या प्रमाणावर व्यसनमुक्तीचे कार्य करतात. जे अलौकिक तर आहेच परंतु त्यांची गिनीज बुकमध्येसुद्धा नोंद व्हावी अशी ईच्छा प्रकट करतात.

अरूण मेहता यांनी दादांच्या कर्तृत्वाचा गौरव करताना दुथडी भरून वाहणाऱ्या नदीची उपमा दिली आहे. यांच्या कार्यात दुथडी भरून माणसे वाहतात. परंतु ती सर्व सुसंस्कृत, कार्यप्रविष्ठ

स्वयंशिस्तीचीच माणसे असतात. असा कौतुकाचा नवा आयाम त्यांनी या उपमेतून दिला आहे.

पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करताना त्यांच्या विषयी ते म्हणतात, “माणसामाणसामध्ये हृदयाची बंधने निर्माण करून माणुसकी कशी जोडता येईल हे स्वतः दादा कसे करतात, हे पाहण्याचाही योग मला आलेला आहे. संधी लाभलेली आहे. त्यांच्या एका कवितेतील ओळी ह्या प्रसंगी ते सांगतात”

**“मन जुळते तो क्षण सोन्याचा**
**एक दुजाला सावरण्याचा**
**शब्दाविणा हृदयाचे स्पंदन**
**देह तिथे हुंकार,**
**संस्कार असा संस्कार”**

**४) श्रीमती लक्ष्मीबाई भुवड –**

**रोजगार हमी योजनेच्या कामावर स्त्री – पुरूषांना समान वेतन मिळण्यासंबंधी श्रीमती लक्ष्मीबाई भुवड यांचा ठराव**

रोजगार हमी योजनेमध्ये पुरूष व महिलांना समान वेतन द्यावे अशी ही विधानसभा शासनाला शिफारस करीत आहे.

अध्यक्ष महाराज हा ठराव आणण्यामागे माझा एक मोठा व महत्वाचा उद्देश आहे. हा ठराव मांडताना मला एवढे समाधान वाटते की, स्त्रियांच्या बाबतीत सहानुभूती दाखविण्याच्या दृष्टिने ज्यांनी यावर बोलावयाचे ठरविले आहे, त्याबद्दल अगोदरच मी त्यांना धन्यवाद देते. सरकारने रोजगार हमी योजना नावाची हजारो स्त्री- पुरूषांना कामे देण्याच्या चांगल्या उद्देशाने जी योजना आखली आहे तिला अनुसरूनच आणला आहे. ग्रामीण भागातील शेतमजूराला रोजगार उपलब्ध नसेल त्यावेळी त्यांना रोजगार मिळावा म्हणून त्यांच्यासाठी ही खास योजना आहे. शासनाने हा चांगल्या तऱ्हेने विचार केला. परंतु याचा विचार करीत असताना मला थोडेसे दुःख वाटते की, स्त्री- पुरूषांकरिता समान कायदा आपण निर्माण केला आणि तो आचरणात आणला, पण तो आचरणात आणीत असताना या रोजगार हमी योजनेत स्त्रियांना व पुरूषांना समान वेतन देण्यात दुर्लक्ष केले आहे. ही मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे.

अध्यक्ष महाराज या रोजगार हमी योजनेच्या कामावर आम्हाला अशी परिस्थिती दिसावयाची की, १०० कामगारांत ७५ स्त्रिया आणि फक्त २५ पुरुष पण या ठिकाणी कदाचित असे उत्तर मिळेल का, पुरूष वर्ग भारी श्रमाची कामे करतात पण स्त्रीयासुद्धा कुदळ – फावडी घेऊन रस्त्याची माती खणतानाही आम्ही पाहिल्या आहेत. म्हणजे श्रमाचे काम स्त्रियासुद्धा करीत असतात त्या ठिकाणी वेतनाच्या बाबतीत वरपगडा मात्र पुरूषांचा. तसेच खडक खणतानाही पुरूषाप्रमाणेच स्त्रियांही आम्ही पाहिल्या आहेत, अशी परिस्थिती असताना पुरूष आणि स्त्रिया यांच्या मजुरीत असा भेदभाव का? स्त्रियांना कमी वेतन आणि पुरूषांना

जास्त वेतन हे योग्य नाही. आपण जर पाहिले तर प्रत्यक्ष डोळ्यासमोर आपल्याला काही उदाहरणे दिसतात. या ठिकाणी पुरूष मंत्री आणि महिला मंत्री यात काही भेदभाव केला जातो का? आमदार महिलांबाबतही काही भेदभाव केला जात नाही आणि श्रमिक महिलांत मात्र ह्या प्रकारचा भेदभाव शासन करते हे योग्य नाही.

➢ **विश्लेषण**

एक स्त्री आमदार व पुरूष आमदारांच्या दृष्टिकोणातील फरक या ठिकाणी लक्षात येतो. रोजगार हमी योजनेच्या कामावर स्त्री- पुरूषांना समान वेतन मिळण्यासंबंधी श्रीमती लक्ष्मीबाई भुवड यांनी ठराव मांडला होता. त्यावर महिला आमदार म्हणून लक्ष्मीबाई भूवड व श्रीमती प्रभा शिंदे यांचा महिला दृष्टिकोण व याच विषयाकडे पाहताना नकुल पाटीलव केशवराव पवार यांच्या विचारांची तुलना स्पष्ट जाणवते. लक्ष्मीबाई भुवड म्हणतात, स्त्री – पुरूष कायद्याने समान आहेत. तर ग्रामीण भागात रोजगार हमीच्या कामात समान वेतन का नाही. ते तिला मिळाले पाहिजे, हे सांगताना त्या पुरूष व स्त्री आमदार समानवेतनाचा दाखला देतात.

- **श्रीमती प्रभा शिंदे**

स्त्रिया सर्व प्रकारची कामे करतात कुदळ घेऊन डोंगरही खणतात, रस्ताही खणतात हे आम्ही ग्रामीण भागात पहातो. शिवाय या रोजगार हमीच्या कामावर येण्या अगोदर महिला हंडा – कळशी घेऊन मैलोमैल पाण्यासाठी जातात, पाणी भरणे, स्वयंपाक करणे, धुणे भांडी, स्वयंपाक, मुलांचे संगोपन ही सर्व कामे स्त्रीच करते. व हे सर्व उरकून रोजगार हमी वर जाते. खरतर ती पुरूषापेक्षा जास्तच काम करते. वेळही समानच असतो मग भेदभाव का? उलट स्त्रिलाच वेतन जास्त दिले पाहिजे. हा ठराव शहरातील महिलांसाठी नाही हे सांगत असताना,ग्रामीण भागातही महिला आमदार शहरात काम करणाऱ्या महिलांबद्दलही संकुचित विचार करताना दिसते. शहरातील महिला मौज आणि चैनीसाठी नोकरी करत नाही. घरसंसाराला हातभार लावण्यासाठीच ती धक्के खात प्रवास करून नोकरी करते, त्या ठिकाणीही तिला दुय्यम दर्जाने वागवले जाते. म्हणून ग्रामीण व शहरी स्त्रीमध्ये भेदभाव करू नये. त्यांच्या कष्टात फरक असेल, कामात फरक असेल, स्त्री ही प्रत्येक ठिकाणीच नाडली जाते. परंतु या ठिकाणी लक्ष्मी भुवड व प्रभा शिंदे या ग्रामीण भागातील महिलांचा दृष्टिकोण ग्रामीण भागातील महिलांबद्दल उदात्त व शहरी महिलांबाबत संकुचित दिसतो. ही तुलना तर जाणवतेच परंतु ठळकपणे पुरूषांचा दृष्टिकोण महिलांसंबंधीचा बेफिकिरीचा जाणवतो. पुरूष आमदारांनी या ठरावाला विरोध केला आहे. बारकावे टिपणे, घटनेचा सर्वांगीण विचार करणे हा स्त्रीसुलभ स्वभाव स्त्री-वादी दृष्टीकोणातून दिसून येतो.

- **श्री. नकुल पाटील**

अध्यक्ष महाराज, या सभागृहामध्ये हा जो ठराव आला आहे, त्याला विरोध करण्यासाठी मी उभा आहे. असे म्हटल्यानंतर समोरच्या भगीनी वर्गाची प्रतिक्रिया काय होईल हे मी समजू शकतो. अध्यक्ष महाराज या ठरावाला तत्वतः कोणी विरोध करू शकणार

नाही. पण मघाशी सन्माननीय सदस्या श्रीमती कमला रामन यांनी सांगितले की,"इक्वल वेजेस् फॉर इक्वल वर्क",'सारख्या कामांसाठी सारखे वेतन' देण्यात आले पाहिजे असे त्यांनी सांगितले. पण याच संदर्भात रोजगार हमी योजनेचा जर आपण विचार केला तर त्या ठिकाणी मोठमोठे दगड उचलणे किंवा यासारखी जी कठीण कामे असतात ती कामे भगिनी करू शकत नाहीत. किंबहुना त्यांना ती कामे करावयाला जरी सांगितले तरी त्याबद्दल आरडाओरड होण्याची शक्यता आहे. हा ठराव मांडताना सन्माननीय सदस्या श्रीमती भुवड यांनी सांगितले की, सचिवालयातील फुलपाखरू इकडे तिकडे फिरत असतात, उपहारगृहामध्ये, प्रसाधन गृहामध्ये जाण्यामध्येच त्यांचा वेळ वाया जातो. ही परिस्थिती आपण पाहिल्यावर आपणच सांगाल की त्यांचा पगार कमी केला पाहिजे, अध्यक्ष महाराज, ठाणे जिल्हा परिषदेची परिस्थिती जर आपण पाहिली तर त्या ठिकाणी इतक्या भगिनी काम करतात की, तेथील अधिकाऱ्यांना काम करणे कठीण जाते.

अध्यक्ष महाराज खरोखरीच जर समान काम होत असेल तर समान वेतन द्यावयाला पाहिजे. पण हलक्या प्रतीचे जर काम असेल, तर तेवढाच मोबदला द्यावयाला पाहिजे. या दृष्टिने हा मुद्दा मी मांडत आहे. निरनिराळ्या कार्यालयांमध्ये काम करणाऱ्या महिलांचा वेळ हा मी मघाशी सांगितल्याप्रमाणे जात असतो. मग कामासंबंधी त्यांना अधिकारी बोलले तर त्यांच्या डोळ्यांतून गंगायमुना वहावयाला लागतात. त्यामुळे परत त्यांना काम सांगता येत नाही. म्हणून या ठिकाणी समान वेतनाची मागणी करणे गैर आहे. या रोजगार हमीच्या बाबतीत जी कठीण कामे आहेत. जी कामे महिलांना देता येण्यासारखी नाहीत ती त्यांना सांगणेही बरोबर नाही. व त्याप्रमाणातच त्यांना वेतन देणे योग्य आहे म्हणून मी या ठरावाला विरोध करीत आहे. एवढेच सांगून मी माझे भाषण संपवितो.

- **श्रीमती प्रभा शिंदे**

अध्यक्ष महाराज या ठरावाला पाठिंबा देण्यासाठी मी उभी आहे. तसेच आताच माननीय सदस्य श्री. नकुल पाटील यांनी या ठिकाणी भाषण केले. त्याला मनःपूर्वक विरोध करण्यासाठी मी उभी आहे. हा ठराव ज्यावेळी आला त्यावेळी त्यामध्येच असे सांगितले आहे की, हा ठराव फक्त ग्रामीण विभागामध्ये रोजगार हमी योजनेमध्ये काम करणाऱ्या महिलांपुरताच मर्यादित आहे. शहरामध्ये आपल्या चैनीसाठी कार्यालयामध्ये काम करणाऱ्या महिलांसाठी हा ठराव नाही. कारण ग्रामीण विभागामध्ये ज्या वेळी स्त्री आपले घर सोडून, संसार सोडून, मुले-बाळे सोडून, घराचा उंबरठा ओलांडून बाहेर पडते. त्यावेळी तिला तितकीच गरज असल्याशिवाय तिची परिस्थिती तितकीच कठीण असल्याशिवाय ती आपले घर सोडून बाहेर नोकरीसाठी पडत नाही. ही गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे. हा ग्रामीण आणि शहरी महिलांतील फरक आहे. ग्रामीण रोजगार योजना जी सुरू झाली तीथे उत्पादन वाढावे, त्याला काही हातभार लावावा या दृष्टीने सुरू झाली तेव्हा त्या योजनेचा कार्यक्रम आपणास पुढेही चालू ठेवला पाहिजे. मी तर म्हणेन त्या योजनेखाली जो कार्यक्रम आपण सध्या घेत आहोत तो आणखी वाढवून घेतला पाहिजे. मुळात रोजगार हमीची जी योजना

सुरू झाली आहे ती बेकारी निवारणार्थ म्हणून सुरू झाली आहे. आणि तोच त्या योजनेचा उद्देश आहे. म्हणून आम्ही या योजनेबद्दल असे म्हणतो की, या रोजगार हमी योजनेखाली घेण्यात आलेल्या कामावर सर्वांना समान वेतन मिळाले पाहिजे तशीच आमची भूमिका आहे. माझ्या दृष्टिने या समान वेतनाच्या मागणीमागे तीन मुलभूत उद्देश आहेत. त्यातील पहिला उद्देश असा की, या योजनेखाली जी कामे घेण्यात येतात त्यामध्ये पाझर तलाव, बांधबंदिस्ती, रस्त्या तयार करणे, खडी टाकणे इत्यादी सर्व कामे त्यात येतात.

- **विश्लेषण**

श्री. नकुल पाटील, श्रीमती लक्ष्मीबाई भुवड, श्रीमती प्रभा शिंदे "स्त्री – पुरूषांना समान वेतन" हा ठराव मांडण्यात आला होता.

कमला रामन – 'इक्वल वेजेस फॉर इक्वल वर्क' सारख्या कामात समान वेतन मिळावे.

त्यावेळी श्री. नकुल पाटील रोजगार हमी योजनेच्या कामासंबाधी बोलतात, या कामात, खोदकाम, मोठे दगड उचलणे, स्त्रिया करायला मागत नाहीत. मग महिलांना समान वेतन का द्यायचे? देऊ नये असे ते सूचवतात. स्त्रीया घरातील सर्व कामे करून पुरूषांच्या बरोबरीने काम करतात. त्यांना समान वेतन मिळालेच पाहिजे. असे प्रभा शिंदे सूचवतात. एक स्त्रीच कष्टकरी स्त्रियांच्या अडचणी समजू शकते. पुरूष नाही.

श्रीमती भुवड याला अपवाद आहेत, त्या महिला कर्मचाऱ्यांची फूलपाखरू म्हणून कुचेष्टा करतात. असे नकूल पाटील सांगतात तेव्हा श्रीमती भूवड सांहतात गैरसमज करू नका. हा प्रस्ताव ग्रामीण महिलांसाठी आहे. महिला कामात टंगळमंगळ करतात. अधिकारी बोलले की महिलांचे अश्रू वहायला लागतात. मग त्यांना समानवेतन का द्यायचे? अपवादात्मक अशाही काही महिला असतात.

यावर प्रभा शिंदेंचे उत्तर – त्या या प्रस्तावाला पाठिंबा देतात. हो समानवेतन समान कायदा हवा. ग्रामीण भागात स्त्रिया जेव्हा या कामावर जातात, त्या आपले गाव, घर, मुले सोडून दुसऱ्या मुलखात गावात काम करतात. रोजगार हमी मध्ये जे देतील ते महिलांना काम करावेच लागते. मग त्यांना वेतन कमी का? पुरूषांपेक्षा स्त्रीला अधिक काम असते कामावर येण्याआधी तिला घरची कर्तव्ये, स्वयंपाक, धुणी, भांडी, केरकचरा करावाच लागतो. पुरूष हे करत नाहीत, घरची कामे करून शिवाय रोजगार हमीची ड्यूटी तिला करावी लागते. मग ती पुरूषांच्या बरोबरीने वेतन का घेऊ शकत नाही. या ठिकाणी श्रीमती लक्ष्मी भूवड, प्रभा शिंदे, महिलांचा सर्वांगीण विचार करतात. रोजगार हमी योजनेचा उद्देश समजावून सांगतात.

**५) प्राथमिक,माध्यमिक व उच्च शिक्षणाबाबत योग्य निर्णय वेळेवर न घेणे यासंबंधात नियम २५१ अन्वये श्री.मु.त्र्यं.कुलकर्णी आणि श्री. ग.रा.वैद्य यांचा प्रस्ताव**

**श्री.मु.त्र्यं. कुलकर्णी (पुणे विभाग शिक्षक)**

शिक्षक संघाच्या धोरणाचा या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी उल्लेख केला व कोपरखळी मारण्याचा प्रयत्न केला. परंतु मी या ठिकाणी कोपरखळी मारू इच्छित नाही. परंतु

शिक्षक प्रतिनिधींना अशा प्रकारे विश्वासात न घेतल्यामुळे जे निर्णय घेतले जातात त्याबाबत मग पाठीमागून अशी गडबड होते. शिक्षण हा विषय केवळ या बाजूचा वा त्या बाजूचा विषय आहे असे नाही. हा संपूर्ण समाजाचा विषय आहे. सर्वांनी एकत्र बसून विचार करण्याचा विषय आहे. अध्यक्ष महाराज एकदम सर्व प्रश्न सुटणार नाहीत, पैशाची अडचण आहे हे मला मान्य आहे. परंतु जेव्हा कोणता तरी एक पक्ष डोळ्यासमोर ठेवून याबाबत विचार होतो, तेव्हा दुसऱ्याला दोष देण्याची भूमिका घेतली जाते व मूळ मुद्दा बाजूला राहतो. कन्सलटेटिव्ह कमिटीचा हवाला आम्हाला देऊ नका एवढेच मला त्याबाबत शिक्षण मंत्र्यांना सांगावयाचे आहे. रोजगार हमीप्रमाणे आपण शिक्षणाचे प्लॅनिंग केले तर ते अधिक बरे होईल. रोजगार हमीप्रमाणे पक्षीय दृष्टीकोन न ठेवता हा राज्याचा विषय समजून, सर्व समाजाचा विषय समजून जर आपण ह्यासाठी काही प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणाबाबत योग्य निर्णय वेळेवर न घेणे हा एक भाग, धोरणातून उद्भवणाऱ्या समस्यांचा व आवश्यकता या आधी पुरेसा अंदाज करून त्याबाबत तरतूदी न करणे हा दुसरा भाग.

- **श्री.अरूण दोंदे**

आज प्राथमिक शिक्षण क्षेत्रात शिक्षकांना ज्या अडचणींना तोंड द्यावे लागत आहे आणि शिक्षक, पालक व विद्यार्थी यांना जो त्रास सोसावा लागत आहे त्यातील प्रश्नांची दखल जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी घेत नाहीत. मला वाटते की प्राथमिक शिक्षणासंबंधीची सर्व जबाबदारी आपण शिक्षणाधिकाऱ्यावर टाकली पाहिजे. आणि या क्षेत्रात कार्य व्यवस्थितपणे चालले किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी आपण ए.डी.आयवर टाकली पाहिजे. यासाठी ए.डी.आय. च्या पोस्ट जरूरीप्रमाणे वाढविल्या पाहिजेत. प्राथमिक शिक्षकांच्या ज्या काही मागण्या असतात. त्यांना ज्या काही सवलती व सुविधा द्यावयाच्या असतात त्याकडे लक्ष दिले गेले पाहिजे. प्राथमिक शिक्षकांच्या वेतनश्रेणीबाबत विचार करण्यासाठी मोहिते कमिशन नेमण्यात आले होते व त्या कमिशनने आपला अहवालही सादर केलेला आहे. त्यांनी असे सुचविलेले आहे की दोन वेतनवाढी देऊन हा प्रश्न सोडविण्यात यावा. परंतु ते प्रपोजल औपचारिकरित्या महाराष्ट्र शासनाकडे पाठविले पण त्याला शासनाने मान्यता दिली नाही.

- **श्रीमती प्रतिभा पाटील**

श्री. मुकुंदराव कुलकर्णी यांनी हा प्रस्ताव या ठिकाणी आणून शिक्षण खात्याशी संबंधित अशा मूलभूत प्रश्नासंबंधी चर्चा उपस्थित केली याबद्दल सुरूवातीलाच मी त्यांचे आभार मानते. अशा पद्धतीने वारंवार या विषयावर चर्चा करून मधून मधून जे प्रश्न निर्माण होतात त्यावर उपाययोजना होणे आवश्यक आहे. त्यासाठी अशा प्रकारची चर्चा अपेक्षित आहे. इष्टही आहे. शिक्षण खात्याचा पसारा महाराष्ट्रभर कानाकोपऱ्यात पसरलेला आहे. जिल्ह्याच्या ठिकाणापासून खेड्यापर्यंत ते पोहोचले आहे. त्यामुळे कुठे ना कुठे तरी उणिवा, त्रुटी निर्माण होणे, गैरव्यवस्था निर्माण होणे शक्य आहे. या गोष्टी एखाद्या वेळी कोणाच्या चुकीमुळे किंवा परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या असतील. अशा प्रकारच्या चर्चेतून जर काही प्रश्न सुटू शकतील तर आम्हाला त्यात आनंदच आहे.

सुरूवातीला मूलभूत मुद्दा असा उपस्थित केला गेला की, ज्यांना शैक्षणिक पार्श्वभूमी नाही त्यांच्यावर नवीन अभ्यासक्रम लादल्याने त्यांना तो पेलवत नाही. तेव्हा त्यांच्या साठी काही तरी विशेष करणे आवश्यक आहे. जे शिक्षक आहेत त्यांचे रीऑरिएन्टेशन सर्व ठिकाणी झाले आहे असे नाही. सर्व विषयांचे शिक्षक मिळतात असे नाही, जे शिक्षक असतात त्यांचे बरोबर नियोजन केले जात नाही. अशा अनेक प्रकारच्या अडचणी येऊ शकतात. शिक्षणाचा स्तर उंचावला पाहिजे ही बाब अमान्य करता येणार नाही. हे आपण एकीकडे लक्षात ठेवले पाहिजे. ज्ञान झपाट्याने बदलत आहे. ज्ञानाच्या कक्षा वाढत आहेत. अशा वेळी तोच जुना अभ्यासक्रम चालू ठेवावा, शिक्षणाची कक्षा सीमित ठेवावी असे म्हणणे बरोबर होणार नाही. कोठारी कमिशनने अभ्यासक्रमाच्या संदर्भात ज्या शिफारशी केल्या होत्या त्याप्रमाणे अभ्यासक्रमात बदल घडवून आणला आहे आणि तो आवश्यकही होता. देशात आणि राज्यात नवीन अभ्यासक्रमाप्रमाणे शिक्षण घेणारे विद्यार्थी हे वेगवेगळ्या परिस्थितीतून येणारे विद्यार्थी आहेत. काही विद्यार्थी हे शैक्षणिक पार्श्वभूमी नसलेले आहेत.

आपल्याला शिक्षण सगळ्यांना द्यावयाचे आहे. एका बाजूला शिक्षणाचा स्तर वाढविणे आवश्यक झाले आहे आणि दुसऱ्या बाजूला या देशात आणि या राज्यात जी सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक परिस्थिती आहे ती काहींना पेलवते, तर काहींना ती पेलवत नाही आणि म्हणून यामधून सोल्यूशन कसे काढायचे, मार्ग कसा काढायचा हा प्रश्न आहे.

- **श्री. मा.प.मंगुडकर**

भ्रष्टाचार हा कोणताही असला तरी वाईटच. परंतु शिक्षण संस्थांमधून हा जो जातिवादाचा भ्रष्टाचार माजला आहे तो भयावह आहे व म्हणून मला असे वाटते की अशा शाळातून नेमणूक करताना किमान ३५ टक्के मागासवर्गीय शिक्षकांना घेतलेच पाहिजे असे बंधन शासनाने घालावे अन्यथा समाजाचा पायाच खचून जाईल. अध्यक्ष महाराज जाता जाता आणखीही एका मुद्याचा उल्लेख मला करावयाचा आहे. कॉलेजच्या एकूण उत्पन्नातून ८० टक्के उत्पन्न पगारासाठी खर्च करावे व उरलेल्या २० टक्क्यातून बाकीचा खर्च भागवावा असे एक परिपत्रक नुकतेच निघाले आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा कॉलेजच्या माध्यमातून विकास झाला पाहिजे. हे तत्व पराभूत करणारे परिपत्रक शिक्षण खात्याच्या अधिकाऱ्यांनी तयार करताना शैक्षणिक मूल्यांचा विचार केला होता किंवा नाही याची मला कल्पना नाही. परंतु शासनाने याचा गंभीरपणे विचार करावा एवढेच मला शेवटी सांगावयाचे आहे.

- **विश्लेषण**

प्राथमिक,माध्यमिक व उच्च शिक्षणाबाबत योग्य निर्णय वेळेवर न घेणे यासंबंधात नियम २५१ अन्वये श्री.मु.त्र्यं.कुलकर्णी आणि श्री. ग.रा.वैद्य यांनी प्रस्ताव मांडला त्याबाबत तत्कालीन शिक्षणमंत्री प्रतिभाताई पाटील यांनी जेव्हा उत्तर दिले. त्यावर कुलकर्णी म्हणतात, शिक्षणमंत्र्यांनी कोपरखळी मारली परंतु मी मारणार नाही. शैक्षणिक धोरण हे सर्व समाजाचे असते सर्वांनी एकत्र बसून शिक्षण विषयक निर्णय घेणे आवश्यक आहे. एखाद्या पक्षाच्या दृष्टिने काय योग्य आणि काय अयोग्य हे असता कामा नये.

रोजगार हमी प्रमाणे शिक्षणाचाही विचार, नियोजन केले तर बरे होईल. मूळ मुद्द्यांना बगल देऊ नये. या धोरणातल्या त्रुटी ते या प्रस्तावातून मांडतात. यावर तत्कालीन आमदार श्री. अरूण दोंदे ही या प्रस्तावाला पाठिंबा देतात. प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांवर व या क्षेत्रातले काम व्यवस्थित चालले की, नाही हे पाहण्याची जबाबदारी ए.डी.आयवर टाकता यावी यासाठी त्या पोस्ट भरल्या. औपचारिक प्रपोजल पाठवूनही शासनाने त्याला मान्यता दिली नाही. प्रतिभाताई पाटील (शिक्षणमंत्री) यांनी या प्रस्तावाचे कौतुकच केले आहे. पुरूष सदस्यांचा जरी तिरका दृष्टिकोण असला तरी, प्रतिभाताई सूचवतात की याबाबत वारंवार चर्चा व्हाव्यात. जिल्हास्तरापासून खेड्यापाड्यापर्यंत शिक्षणाबाबतच्या या योजना राबवताना त्रुटी राहणारच! ज्ञान झपाट्याने वाढत आहे. ज्ञानाच्या कक्षा रूंदावत आहे. अशा वेळी तोच जुना अभ्यासक्रम चालू ठेवावा, हे संयुक्तिक नाही. कोठारी कमिशनच्या शिफारशी प्रमाणे हे चालू आहे. राज्यसरकारवर किंवा कारभारावर निष्कारण ठपका ठेवू नये. जी सामाजिक, सांस्कृतिक परिस्थिती आहे ती कशा पद्धतीने अधिक उज्ज्वल करता येईल अशा पद्धतीने सकारात्मक विचार व्हावा. प्रतिभाताई सकारात्मकदृष्ट्या इथे उत्तर देतात.

**६) श्रीमती मृणालताई गोरे**

**अनुदानाकरिता मागण्या – नगरविकास, आरोग्य व गृहनिर्माण विभाग १९३६**

**(दि.३ जुलै १९७२)**

**भाषणाचा विषय – जुन्या चाळींची दुरूस्ती आणि भाडेकरूंच्या समस्या**

अध्यक्ष महाराज, ह्या चाळींच्या भाड्यामधून मेंटेनन्स चार्ज वसूल केला जातो. परंतु या चाळी पाडावयाच्या आहेत, म्हणून त्यांतील एक दिडकीही या चाळींच्या मेंटेनन्ससाठी खर्च झालेली नाही. हे बोर्ड संडास बदलावयास तयार नाही. नवीन चाळी बांधावयास तयार नाहीत, नव्या चाळी की ज्या ७३ ते ८७ रूपये भाड्याच्या आहेत. ज्या भाडेकरूंना परवडत नाहीत. त्या द्यावयास तयार आहे. तेव्हा यासंबंधी काही तरी फैसला व्हायला पाहिजे. जर खाजगी मालक असेल तर रेंट ॲक्टप्रमाणे महापालिकेच्या ४९९ कलमाप्रमाणे त्या गाळ्यांच्या दुरूस्तीचा खर्च भाड्यातून वगळता करून त्यांची दुरूस्ती करता येते, परंतु गृहनिर्माण मंडळाच्या बाबतीत ते करता येत नाही. अध्यक्ष महाराज, शास्त्रीनगरची परिस्थिती आपल्याला माहीत आहे. ते प्रकरण मी सभागृहाला सांगितलेले आहे. त्या गाळ्यांची दुरूस्ती अद्याप झालेली नाही. त्या ठिकाणी प्लॅस्टर पडते, ते संपूर्ण काढून टाकून त्या जागी मी सूचविलेल्या पद्धतीप्रमाणे नवीन प्लॅस्टर करावयास पाहिजे. ते काम आम्ही सुरू करीत आहोत, पैसे राखून ठेवले आहेत, असे त्यांनी सांगितले, परंतु अजून ते काम झालेले नाही. पुन्हा पुन्हा तक्रार करूनही ते काम होत नाही. अध्यक्ष महाराज नेहरूनगरच्या गाळ्यांची काय परिस्थिती आहे हे आपण वर्तमानपत्रात वाचले. तेथील वसाहतीमध्ये सर्व तळमजल्यावर पाणीच पाणी शिरले होते. पाण्याचा निचरा होण्यासाठी जी ड्रेनेजची योग्य सोय पाहिजे ती तेथे नाही, तसेच योग्य ते भराव त्या ठिकाणी टाकावयास पाहिजे होते ते टाकले गेले नाहीत, त्यामुळे तेथील

गाळ्यांतील लोकांचे अतिशय हाल होत आहेत. दादाभाई नौरोजीनगर, अंधेरी या चाळींच्या येथे ७-८ फुटांचे खोल  खड्डे आपणास पहावयास मिळतील. ह्या चाळीचे ज्यावेळी बांधकाम चालू होते त्यावेळी जो भराव टाकावयास हवा होता, त्यासाठी लागणारी जी माती हवी होती, ती माती संबंधित कॉंस्ट्रक्टरने बाहेरून न आणता त्या गाळ्याच्या शेजारच्या जमिनीमधून घेतली व भर टाकली . त्यामुळे हे खड्डे तेथे पडले असावेत अशी मला शंका येते आहे.

- **विश्लेषण**

गृहनिर्माणसारख्या महत्त्वाच्या विषयावर बोलताना, मृणालताईंनी चाळीमध्ये राहणाऱ्या रहिवाश्यांच्या समस्या किती तीव्र असतात. याचे दाखले दिले आहेत. मोडकळीला आलेल्या चाळी योग्य पद्धतीने पाडत नाहीत वा त्यांची दुरूस्तीही करत नाहीत. भाडे मात्र नियमित वसूल केले जाते. जर मेंटेनन्सचा खर्च भाड्यातून घेतला जात असेल तर,  तो का खर्च केला जात नाही, त्यांनी शास्त्रीनगर परिसरातील चाळींची दुरावस्था वर्णन केली आहे. प्रत्यक्ष चाळकरीही आत्मीयतेने हा विषय मांडणार नाही एवढ्या आत्मीयतेने तो त्यांनी मांडला आहे. प्रत्येक विषयाच्या तळाशी जाण्याची वृत्ती स्त्रिची असते, हे यावरून दिसते.

स्त्री ही व्यवहारी असते, भाडे घेता मग सुविधा देणे हे तुमचे कर्तव्य तर आहेच, परंतु कायदा सुद्धा तुम्हाला याचा जाब विचारेल. पिण्याचे पाणी व शौचालये नीट नसलीत, त्याची दुरूस्ती करत नसाल तर रहिवाशांनी भाडे तरी का द्यायचे? हा संयुक्तिक प्रश्न त्यांच्या भाषणातून त्या सभागृहासमोर आणतात.

## ७) श्रीमती कुमुद रांगणेकर

### भाषणाचा विषय- गृहनिर्माण मंडळाच्या घरांची अवस्था

गेल्या आठवड्यात मी औरंगाबाद येथील गृहनिर्माण मंडळाच्या गाळ्यात चक्कर मारून आले. दोन-तीन तास त्या ठिकाणी वास्तव्य केल्यानंतर मला असे वाटू लागले की, त्या ठिकाणी एक पाटी लिहावी की,  ‘या ठिकाणी माणसे राहतात’ या ठिकाणच्या गाळांची अवस्था पाहण्यासारखी आहे. मी ज्या घरांतून फिरले त्या ठिकाणी आणि साधारणः ५० टक्के घरे अशी आहेत की, त्या घरात जी दारे आहेत त्यांना दारे का म्हणावयाचे हे समजत नाही. खिडक्या आहेत पण खिडक्यांना गज नाहीत. व्हेन्टिलेशनसाठी गज ठेवले नाहीत की काय माहीत नाही.

त्यांनी त्याची पूर्ती करण्याचे आश्वासन देलेले आहे. परंतु ते केवळ आश्वासन राहू नये, तेथील माणसांचा विचार करून ज्या निकडीच्या सोयी पाहिजेत त्या उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. तेथील गटारांचा, नळांचा, संडासाचा, रस्त्यांचा, पडक्या छतांचा, खिडक्या दारांचा मोठा प्रश्न आहे. त्या सर्वांची व्यवस्था करावी. सन्माननीय सदस्य श्री. राम मेघे यांनी सांगितले त्याप्रमाणे त्यांच्या बोर्डावर भाडेकरूंचा प्रतिनिधी अवश्यमेव घेतला पाहिजे. तेथील भाडेकरू सर्व सुखसोयींची व्यवस्था पाहतील. झटतील तेव्हा त्यांच्यातील एक प्रतिनिधी त्या गृहनिर्माण मंडळावर घेतला तर निश्चितपणे ते ह्या कारभारामध्ये सुधारणा करू शकतील

.तसेच त्या ठिकाणी सायंकाळी दोन तास तरी दवाखाना उघडा ठेवाला अशी तेथील रहिवाश्यांची मागणी आहे. तेव्हा ह्या सर्व गोष्टी आहेत त्या सर्वांचा विचार करून त्यासंबंधीची सोय करून देणे. शासनाची जृबाबदारी आहे.

- **श्री. मनोहर जोशी**

सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. राम मेघे यांनी हा जो प्रस्ताव मांडला त्याबद्दल त्यांचे मी प्रथम अभिनंदन करतो. या प्रश्नाविषयी चर्चा होणे अतिशय आवश्यक होते. सभागृहामध्ये इतर वेळी व प्रश्नोत्तराच्या वेळी होणारी याबाबतची चर्चा व अशा प्रकारचा प्रस्ताव येऊन त्यावर होणारी चर्चा यामध्ये फार फरक असतो. गृहनिर्माण मंडळाच्या कारभारावर यानिमित्ताने बरेच बोलणे शक्य आहे. तरीसुद्धा काही ठराविक मुद्द्यापुरते मी माझे भाषण करणार आहे. आताच या सदनाच्या सन्माननीय सदस्या, श्रीमती रांगणेकर यांनी त्यांच्या भाषणामध्ये जे वर्णन केले आहे ते औरंगाबादच्या एकनाथ नगरचे होते. अध्यक्ष महाराज, माझी सासुरवाडी तेथे आहे. मी खरे सांगतो या गृहनिर्माण मंडळाच्या तेथील कारभारामुळे गेली ३-४ वर्षे मी माझ्या सासुरवाडीला जाण्याचे धाडस करू शकलो नाही.

➢ **विश्लेषण**

आमदार कुमुदिनी रांगणेकर या गृहनिर्माण मंडळाच्या कारभाराबद्दल बोलताना औरंगाबाद येथील एकनाथ नगरच्या चाळींची दुरावस्था विषद करतात. त्या गांभिर्याने या विशयावर बोलत असतात. परंतु आमदार मनोहर जोशी, हा गंभीर विषय इतका सहज व गमतीने घेतात व सांगतात माझी सासूरवाडी तेथे आहे, परंतु ३ ते ४ वर्ष मी तिकडे जात नाही. कारण गृहनिर्माण मंडळाचा कारभार. एका गंभीर विषयाकडे स्त्री आमदार आत्मियतेने बघते, काळजीपूर्वक मत मांडते परंतु पुरूष आमदार मात्र निडरपणे त्याकडे पहातात.

**८) श्रीमती प्रभा राव**

**भाषणाचा विषय – पेपरफुटीची समस्या**

रसायनशास्त्र, इतिहास व नागरिकशास्त्र या विषयांच्या प्रश्नपत्रिका फुटल्याच्या वार्तेमध्ये तथ्य नसल्याचे चौकशीअंती आढळून आले व त्यामुळे या विषयांच्या फेरपरिक्षा घेण्याची आवश्यकता नाही असा निर्णय परीक्षा समितीने घेतला.

मुंबई बाहेर, विशेषकरून पुणे, नागपूर, इत्यादी शहरांतून प्रश्नपत्रिका फुटल्याच्या तक्रारी वा वार्ता मंडळात्या कुठल्याही कार्यालयाकडे वा अधिकाऱ्याकडे आल्या नसल्यामुळे बृहन्मुंबई बाहेर या संबंधी काही कार्यवाही करण्याची आवश्यकता मंडळास भासली नाही. जीवशास्त्र व भौतिकशास्त्री या विषयांच्या फेरपरीक्षेबाबत घोषणा होण्यापूर्वी वा ती घोषणा न समजल्यामुळे काही विद्यार्थी अगोदरच बृहन्मुंबई सोडून बाहेर गावी गेले असल्यास व त्यामुळे त्यांना या फेरपरिक्षेस बसणे शक्य न झाल्यास केवळ अशा विद्यार्थ्यांच्या बाबतीतच त्यांचे नुकसान होऊ नये याकरिता काय कार्यवाही करावी याचा मंडळाकडून योग्य तो विचार होईल.

या दुर्दैवी घटनेमुळे विद्यार्थी व पालक यांना झालेल्या अडचणीबद्दल मंडळ दिलगीर आहे. या प्रकरणाचा पूर्ण छडा लागावा याकरिता कोणीही व्यक्तिस काही पुरावा किंवा माहिती सादर करावयाची असल्यास तिने ती, माध्यमिक शिक्षण मंडळाच्या मुंबई येथील (रूपारेल कॉलेज, माटुंगा येथील) कार्यालयाकडे किंवा पोलिसांना सादर करावी व त्यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन मंडळाने या पूर्वीच केले आहे. या प्रकरणी सर्व संबंधितांच्या मदतीने कसून तपासणी करण्यात येत आहे. या प्रकरणी दोषी ठरलेल्या सर्व संबंधितांवर योग्य ती कडक कार्यवाही करण्यात यावी.

- **श्री. प्रमोद नवलकर –**

अध्यक्ष महाराज, हा खुलासा म्हणजे शासनाने आपली जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न केलेला आहे. बुधवारच्या दिवशी केमिस्ट्रिचा पेपर फुटला होता त्या प्रश्नांचे रिप्रॉडक्शन टाईम्स ऑफ इंडियामध्ये आलेले आहे. घोडबंदरच्या एरियामध्ये पेपर फुटलेला आहे. बांद्रा येथील प्रिन्सिपॉलनी कोणता पेपर फुटला हे सांगितलेले आहे. हा तपशील दिला असताना केवळ मंत्री महोदयांपर्यंत ही बातमी पोहोचलेली नाही. म्हणून दुसरे कोणतेही पेपर फुटले नाहीत. ते आम्हाल स्वीकारता येत नाही. दुसरे म्हणजे पुण्यासारख्या ठिकाणी पेपर फुटला नाही हे म्हणणे अतिशय अविवेकी आहे. मी जर या ठिकाणी परिक्षेला बसलो असेन तर पुण्यामध्ये माझे नातेवाईक आणि मित्र निश्चितपणे आहेत आणि जर मला माझा पेपर कळला तर साहजिकच मी माझ्या मित्रांना किंवा नातेवाईकांना टेलिफोनवरून एका मिनिटामध्ये तो पेपर कळवू शकतो. त्याचा जास्त गाजावाजा जरी झालेला नसेल, एका माणसाला नव्हे तर पाच पंचवीस माणसांना तरी पेपर कळलेला असेल. तर पहिल्या क्रमांकाने येणाऱ्या विद्यार्थ्यावर केवढा मोठा अन्याय होणार आहे. याची शिक्षण मंत्र्यांना कल्पना आहे का? पहिल्या क्रमांकाने जे विद्यार्थी येतात, पहिल्या पंचवीस किंवा पन्नास क्रमांकाने येणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये अर्ध्या किंवा एका मार्काचा फरक असतो. पुण्यात किंवा इतरत्र हा पेपर गेलेला नाही असे म्हणणे, वस्तुस्थितीचा विपर्यास करण्यासारखे आहे. हा प्रश्न टाळण्यासारखा आहे. अध्यक्ष महाराज तिसरी गोष्ट म्हणजे जे बाहेर गावी गेलेले विद्यार्थी आहेत त्या बाबतीत आम्ही काय करणार आहोत याचे उत्तर अद्यापि आम्हाल मिळू शकत नाही. तरीत्यांची तिसरी परीक्षा घेणार आहात काय?

- **विश्लेषण**

श्रीमती प्रभा राव शिक्षण मंत्री या नात्याने सविस्तर माहिती देतात. पेपर फुटला त्याची कारणे आम्ही शोधतो आहोत. परंतु विद्यार्थ्यांची फेरपरिक्षा देखील घेत आहोत. शिक्षणमंडळ विचार विनिमय करून निर्णय घेईल. यावर आमदार प्रमोद नवलकर शिक्षण मंत्री प्रभा राव यांना सांगतात ही जबाबदारी टाळण्याचा प्रकार आहे असे म्हणून शिक्षणमंत्र्यांना दुषणे देतात.